


दैनिक
अचूक वेध, अचूक बातमी
# अक्षराज
संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

वर्ष : ०४, अंक : १२६
पाने : ०४, किंमत : ०३ रुपये
संपादक : विनोद कैलास गोरे
RNI NO. : MAHMAR/2022/82056
Follow Us On : www.aksharaj.com
Email : newsaksharaj2021@gmail.com

बुलडाणा, बुधवार, दि.१८ डिसेंबर २०२४

## छगन भुजबळ यांना मंत्रिपद न मिळाल्याने सरकारचा निषेध
## महायुती सरकारला समता परिषदेचा इशारा




**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.१७, अहिल्यानगर :** ओबीसींचे जेष्ठ नेते छगन भुजबळ यांना महायुती सरकारने मंत्रीमंडळात स्थान न दिल्याने अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेच्या वतीने शहरातील माळीवाडा येथिल महात्मा फुले यांच्या पुतळ्याजवळ निदर्शने करून काळी फीत लावून सरकारचा जाहीर निषेध करण्यात आला.

यावेळी समता परिषदेचे प्रदेश उपाध्यक्ष अंबादास गारूडकर, जिल्हाध्यक्ष सुभाष लोंढे, महानगर अध्यक्ष दत्ता जाधव, प्रदेश प्रवक्ते डॉ. नागेश गवळी, रामभाऊ फुले, अनिल निकम, खंडू भुकन, बबनराव घुमटकर, किसनराव रासकर,गोरख आळेकर, मोहित चौधरी, तुषार भुजबळ, प्रशांत शेरकर, राजू गाडेकर, शाहू होले, संकेत खामकर, सौरभ भुजबळ, निशांत शिंदे आदिंसह पदाधिकारी उपस्थित होते. यावेळी जिल्हाध्यक्ष सुभाष लोंढे म्हणाले, महायुती सरकारने मंत्रीमंडळ विस्तार केला यामध्ये जाणीवपूर्वक आमचे नेते छगन भुजबळ यांना डावलण्यात आले. यामुळे संपूर्ण राज्यात असंतोषाची भावना निर्माण झाली आहे. ज्या जेष्ठ नेत्यांचा या सरकारने जो अपमान केला त्याचा बदला समता परिषदेच्या माध्यमातून निश्चितच दाखवून दिला जाईल,असा इशारा त्यांनी दिला आहे.

यावेळी अंबादास गारूडकर, दत्ता जाधव, डॉ. नागेश गवळी, खंडू भुकन,यांनी आपापल्या भावना यावेळी व्यक्त केल्या. यावेळी काळ्या फिती बांधून सरकारचा जाहीर निषेध करण्यात आला.

## उद्धव ठाकरेंनी घेतली फडणवीस, राहुल नार्वेकरांची भेट



**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.१७, नागपूर :** विधानसभा निवडणुकीत विजय मिळाल्यानंतर राज्यात महायुतीचे सरकार स्थापन झाले आहे. यानंतरही विरोधकांकडून सातत्याने निवडणूक प्रक्रियेवर संशय व्यक्त केला जात आहे. यादरम्यान आज अचानक माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी नागपूरच्या विधिमंडळात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि राहुल नार्वेकर यांची भेट घेतल्याचे पाहायला मिळाले. या भेटीची राज्याच्या राजकीय वर्तुळात चर्चा होत आहे. दोन नेत्यांमध्ये नेमकी काय चर्चा झाली? याबद्दल तर्क-वितर्क लढवले जात आहेत. यातच या दोन दिग्गज नेत्यांच्या भेटीवेळी उपस्थित असलेले शिवसेना (उद्धव ठाकरे) पक्षाचे प्रतोद सुनिल प्रभू यांनी या भेटीमध्ये नेमकं काय झालं याबद्दल माहिती दिली आहे. ते टीव्ही९ या वृत्तवाहिनीशी बोलत होते.

उद्धव ठाकरे आणि देवेंद्र फडणीस यांच्या भेटीबद्दल बोलताना प्रभू म्हणाले की, महाराष्ट्राचं राजकारण एक सुसंस्कृत राजकारण आहे. महाराष्ट्रातील राजकारण्यांकडे सुसंस्कृत राजकारणी म्हणून लोक बघतात. मधल्या काळात वातावरण खराब झालं होतं ते महाराष्ट्रासाठी शोभनीय नव्हतं. सार्वत्रिक निवडणुकीनंतर पहिलं अधिवेशन होतं. माजी मुख्यमंत्री आणि शिवसेना पक्षप्रमुख नागपूर येथे अधिवेशनात हजर होते. त्यामुळे महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्यांना भेटून त्यांना पुढील कारकिर्दीसाठी शुभेच्छा दिल्या. याबरोबरच विरोधी पक्ष म्हणून आमची संख्या जरी कमी असली, तरीही जेव्हा जेव्हा सरकारला जे काही सांगण्याची वेळ येईल ते स्पष्टपणे आम्ही सांगू, हे देखील आम्ही तितक्याच तत्परतेने मुख्यमंत्र्यांना सांगितले आहे, असेही प्रभू म्हणाले.

उद्धव ठाकरे आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यातील संवाद उत्तम होता, विधानसभेच्या आवारातील ही भेट होती. या भेटीमध्ये विधानसभेचं कामकाज, सरकारकडून केल्या जाणाऱ्या कामासंबंधीच्या चर्चा खेळीमेळीच्या वातावरणात झालं. राजकारणाव्यतिरिक्त येणार्या काळासाठी शुभेच्छा देणे हा एकमेव उद्देश होता, असेही प्रभू म्हणाले. शिवसेना पक्षातील फूट आणि आमदार अपात्रतेच्या प्रकरणता महत्वाचा निर्णय देणारे विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांचीदेखील उद्धव ठाकरेंनी भेट घेतली. या भेटीबद्दल बोलताना प्रभू यांनी सांगितेल की, मागील घटनाबाह्य सरकारसंबंधीचा खटला सध्या न्यायालयात सुरू आहे. पण कोर्टाने दिलेल्या निर्णयानुसार जी सुनावणी झाली आणि विधानसभा अध्यक्षांनी दिलेला निर्णय एकांगी होता. हे आम्ही तोंडावर सांगितलं.

पुढे बोलताना प्रभू म्हणाले , पण विधानसभेची निवडणूक झाली आणि त्यांना बहुमत मिळालं. बहुमत कशा पद्धतीने मिळालं हा भाग वेगळा आहे. पण आज सत्तेत बसल्यानंतर आणि विधानसभा अध्यक्ष म्हणून त्यांनी पदभार स्वीकारल्यानंतर त्यांना भेटणं आणि मोठ्या मनाने त्यांचे अभिनंदन करणे ही महाराष्ट्राची परंपरा आहे. त्यानुसार उद्धव ठाकरे, आदित्य ठाकरे शिवसेनेचे नेते आम्ही तेथे गेलो होतो आणि आम्ही त्यांचं अभिनंदन केलं.

# ‘लाडक्या बहिणीं’साठी उद्धव ठाकरे यांचा पुढाकार !

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.१६, मुंबई :** लोकसभा निवडणुकीनंतर राज्यातील महायुती सरकारने महिला वर्गाला आकर्षित करण्यासाठी थेट आर्थिक लाभ देणारी (दर महिन्याला १,५०० रुपयांचा हप्ता) मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना आणली होती.



निवडणुकीवेळी महायुतीच्या नेत्यांनी घोषणा केली होती की राज्यात पुन्हा एकदा आमचं सरकार आल्यास ‘लाडकी बहीण योजने’तील पात्र महिलांना दर महिन्याला १,५०० रुपयांऐवजी २,१०० रुपयांचा हप्ता देऊ. आता राज्यात महायुतीचं सरकार आलं आहे. भाजपा नेते देवेंद्र फडणवीस यांनी मुख्यमंत्रिपदाची शपथ घेतली असून त्यांनी त्यांच्या मंत्रिमंडळाचा विस्तार देखील केला आहे. नवं सरकार आल्यानंतर विधीमंडळाचं हिवाळी अधिवेशन चालू झालं आहे. मात्र, लाडक्या बहिणींना त्यांचा या योजनेतील पुढील हप्ता मिळालेला नाही. तसेच २,१०० रुपयांचा हप्ता कधीपासून मिळेल याबाबत राज्य सरकारकडून कोणतीही माहिती देण्यात आलेली नाही. दरम्यान, सरकारने ही योजना तात्काळ चालू करावी, महिलांना २,१०० रुपयांचा हप्ता दिला जावा, ही योजना चालू करताना आवडती नावडती असा भेदभाव करू नये, अशा मागण्या शिवसेना (उबाठा) पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी केली आहे.

विधीमंडळाच्या हिवाळी अधिवेशनासाठी उद्धव ठाकरे नागपुरात दाखल झाले आहेत. त्यांनी नागपुरात प्रसारमाध्यमांशी संवाद साधला. यावेळी ते म्हणाले, आम्ही सर्वच पक्ष वेगवेगळे मुद्दे घेऊन निवडणूक लढलो. आम्हाला सरकार स्थापन करता आलं नाही. परंतु, ज्यांनी सरकार स्थापन केलंय त्यांच्याकडे माझी मागणी आहे की त्यांनी जाहीरनाम्यात ज्या घोषणा केल्या होत्या, जी आश्वासनं दिली होती ती आता पूर्ण करायला सुरुवात करावी. आमचं सरकार आलं असतं तर आम्ही आमची आश्वासनं नक्कीच पूर्ण केली असती. आता जे सरकार आलंय त्यांनी त्यांची आश्वासनं पूर्ण करावी.

**उद्धव ठाकरेंची महायुती सरकारकडे महत्त्वाची मागणी**

उद्धव ठाकरे म्हणाले, या सरकारने लाडकी बहीण योजना आणली होती. मात्र हे सरकार आल्यापासून लाडक्या बहिणींपेक्षा लाडक्या आमदारांची व नावडत्या आमदारांची जास्त चर्चा चालू आहे. परंतु, ते बाजूला ठेवून लाडकी बहीण योजनेचे पैसे महिलांच्या बँक खात्यात जमा करण्यास सुरुवात करायला हवी. या योजनेचे पहिल्या पाच महिन्यांचे पैसे महिलांच्या बँक खात्यात जमा झाले आहेत. मात्र, पुढचे पैसे वाटायला लागू नये म्हणून या सरकारने निवडणूक आयोगाच्या माध्यमातून या योजनेवर स्थगिती आणली. मात्र, आता निवडणूक पार पडली आहे. आचारसंहिता संपली आहे. निवडणुकीच्या आधी महिलांची मतं मिळवण्यासाठी जी योजना आणली होती त्या योजनेअंतर्गत महिलांना पैसे दिले गेले नाहीत. ती योजना तात्काळ सुरू केली पाहिजे. तसेच १,५०० नव्हे तर महिलांच्या खात्यात २,१०० रुपये जमा करायला हवेत. कारण असं आश्वासन त्या लोकांनीच निवडणुकीच्या आधी दिलं होतं.

**सांगितल्याप्रमाणे २,१०० रुपयांचा हप्ता द्यावा : उद्धव ठाकरे**

उद्धव ठाकरे म्हणाले, योजना सुरू करून जे काही एक-दोन महिन्यांचे पैसे महिलांना देणं बाकी आहे ते पैसे तात्काळ त्यांच्या बँक खात्यांवर वळवावेत. ही योजना परत सुरु करताना आवडती-नावडती असं न करता सर्व पात्र महिलांच्या खात्यामध्ये पैसे जमा झाले पाहिजेत. मी मधल्या काळात काही बातम्या वाचल्या. या योजनेला काही निकष लावणार, महिलांच्या अर्जांची पडताळणी करणार, एकाच घरात एकाच महिलेला या योजनेचे पैसे मिळणार, अमुक करणार, तमुक करणार, हे सगळं वाचल्यानंतर एक गोष्ट लक्षात येतेय की हे सगळे यांचे निवडणूक जिंकण्यासाठीचे डाव होते जे आता उघडे पडले आहेत. माझी सरकारकडे मागणी आहे की त्यांनी बहिणींमध्ये आवडती नावडती असा भेदभाव करू नये. ते तसं करू शकत नाहीत. त्यांनी तसं करता कामा नये. जे काही निकष आधी लावले होते त्या अंतर्गत महिलांना पैसे दिले जावे. निकष बाजूला ठेवून त्यांचं वाढतं प्रेम दाखवत महिलांच्या खात्यावर २,१०० रुपये जमा करावेत.


# ‘समृद्धी’वर वाहनाचे टायर फुटले; एक ठार, तीन जखमी

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.१७, बुलडाणा :** नाशिक येथून शेगाव येथे दर्शनासाठी जाणाऱ्या परिवाराची दर्शनाची मनोकामना अधुरीच राहिली. त्यांच्या भरवेगातील चारचाकी वाहनाचे टायर फुटल्याने झालेल्या भीषण अपघातात एका कुटुंबातील एकाचा मृत्यू झाला तर तिघेजण जखमी झाले.

बुलडाणा जिल्ह्यातून जाणाऱ्या हिंदुहृदयसम्राट स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे समृद्धी द्रुतगती महामार्गावर हा विचित्र अपघात झाला. नागपूर कॉरिडॉर वरील चॅनल क्रमांक २९१.६ नजीक सोमवारी (१६ डिसेंबर) रात्री साडे दहाच्या सुमारास ही दुर्घटना घडली. समृद्धी महामार्ग वरून नाशिक येथील खुळे पारिवार मारुती सुजूकी अल्टो (एम एच १५ ई एक्स ५१७४ क्रमाकाच्या) वाहनाने शेगाव येथे दर्शनाला जात होते.

रात्री उशिरा नागपूर कॅरिडोर चॅनेल नंबर २९१.६ या ठिकाणी वाहनाच्या उजव्या बाजूचे मागील टायर फटल्याने भरधाव वेगाने जाणारे वाहन हे रस्त्याच्या बाजूला असणाऱ्या बॅरिकेटला धडकले. यामध्ये वाहन चालक महेश खुळे (राहणार नाशिक) हे गंभीर तर त्यांच्याच परिवारातील सोबतचे ३ सदस्य जखमी झाले. यामध्ये



शकुंतला खुळे (वय ६० वर्षे), दीपाली खुळे वय ३८ वर्षे) आणि धनश्री खुळे (वय १८ वर्षे) यांचा समावेश आहे. अपघाताची माहिती समृद्धी मार्गाच्या गस्तीवर असलेले सह पोलीस निरीक्षक संदीप इंगळे, मेजर खोडे, योगेश शेळके यांना मिळताच त्यांनी घटना स्थळ गाठले. त्यांनी तातडीने बचाव चमू व सुसज्ज रुग्णवाहिका पाचारण केली. गंभीर जखमी महेश खुळे आणि इतर तिघा जखमींना उपचारासाठी मेहकर (जि. बुलडाणा) येथील शासकीय ग्रामीण रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले. मात्र, महेश खुळे यांचा उपचारा दरम्यान त्यांचा मृत्यू झाला. इतर जखमींची प्रकृती स्थिर असल्याचे रुग्णालय आणि पोलीस सूत्रांनी सांगितले.

## पावणेपाच कोटींच्या कोकेनसह डोंगरीतून एकाला अटक



**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.१७, मुंबई :** सुमारे एक किलो कोकेनसह ४५ वर्षीय व्यक्तीला अटक करण्यात डोंगरी पोलिसांना यश आले. आरोपींकडून जप्त करण्यात आलेल्या कोकेनची किंमत पावणेपाच कोटी रुपये आहे. आरोपीविरोधात अमलीपदार्थ प्रतिबंधक कायद्याअंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

डोंगरी पोलीस ठाण्याचे दहशतवाद विरोधी पथकातील सहाय्यक पोलीस निरीक्षक डोंगरी परिसरात गस्त घालत असताना एक संशयीत दुचाकीस्वार त्यांना पाहून पळू लागला. पोलिसांनी त्याला ताब्यात घेऊन दुचाकीची तपासणी केली असता त्यात पांढऱ्या रंगाचा पदार्थ सापडला. तपासणी ते कोकेन असल्याचे निष्पन्न झाले. आरोपीकडून ९४० ग्रॅम कोकेन जप्त करण्यात आले असून त्याची किंमत चार कोटी ७० लाख रुपये असल्याची माहिती पोलिसांनी दिली. आरोपीचे नाव इम्रान याकुब शेख ऊर्फ जुम्मा असून तो डोंगरी सिद्दी मोहल्ला येथील रहिवासी आहे. आरोपीविरोधात अमली पदार्थ विरोधी कायद्या अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला. त्याला न्यायालयापुढे हजर केले असता न्यायालयाने त्याला २१ डिसेंबरपर्यंत पोलीस कोठडी सुनावली. याप्रकरणी डोंगरी पोलीस अधिक तपास करीत आहेत.

सुमारे एक किलो कोकेनसह ४५ वर्षीय व्यक्तीला अटक करण्यात डोंगरी पोलिसांना यश आले. आरोपींकडून जप्त करण्यात आलेल्या कोकेनची किंमत पावणेपाच कोटी रुपये आहे. आरोपीविरोधात अमलीपदार्थ प्रतिबंधक कायद्याअंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## येरवडा कारागृहात कैद्यांमध्ये हाणामारी




**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.१७, पुणे :** किरकोळ वादातून येरवडा कारागृहातील कैद्याला दोघांनी मारहाण केल्याची घटना घडली. याप्रकरणी दोन कैद्यांविरुद्ध येरवडा पोलिसांनी गुन्हा दाखल केला. सुधीर गौतम थोरात असे जखमी झालेल्याचे नाव आहे. याप्रकरणी कारागृहातील कैदी विकी उर्फ विवेक राजेश खराडे, अली अदम शेख यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. याबाबत कारागृहातील रक्षक विश्वास वाकडे (वय ४३) यांनी येरवडा पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, येरवडा कारागृहातील बराकीत १४ डिसेंबर रोजी दुपारी साडेतीनच्या सुमारास कैदी सुधीर थोरात याला विकी खराडे, अली शेख यांना अडवले. ‘कारागृहातून कधी सुटणार?’, अशी विचारणा केली. या कारणावरुन त्यांच्यात वाद झाला. वादातून खराडे आणि शेख यांनी थोरात याला लाथा बुक्क्यांनी बेदम मारहाण केली. मारहाणीत थोरात याची बरगडी, तसेच नाकाला दुखापत झाली. कारागृहात हाणामारी झाल्याची माहिती मिळताच कारागृह रक्षकांनी त्वरीत तेथे धाव घेतली. थोरातला रुग्णालयात दाखल करून त्याच्यावर प्रथमोपाचार करण्यात आले. या घटनेची माहिती मिळताच येरवडा पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक रवींद्र शेळके, गुन्हे शाखेच्या निरीक्षक पल्लवी मेहेर, स्वाती खेडकर यांनी कारागृहास भेट दिली. सहायक पोलीस निरीक्षक विशाल टकले तपास करत आहेत. येरवडा कारागृहात यापूर्वी कैद्यांमध्ये हाणामारीच्या घटना घडल्या आहेत. हाणामारीच्या घटना, तसेच गैरप्रकार रोखण्यासाठी सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आले आहेत.



## संपादकीय

### भारतातील मानसिक आरोग्याचे धोरण

जागतिक आरोग्य संघटनेच्या व्याख्येनुसार मानसिक आरोग्यामध्ये भावनिक, मनोवैज्ञानिक आणि सामाजिक कल्याण यांचा समावेश होतो, ज्याचा आकलनशक्ती, धारणा आणि वर्तन यांवर परिणाम होतो. जागतिक आरोग्य संघटने (डब्ल्यूएचओ) च्या मते, ही एक 'कल्याणाची स्थिती आहे ज्यामध्ये व्यक्तीला तिच्या क्षमतांची जाणीव होते. ती तिच्या जीवनातील सामान्य ताणतणावांचा सामना करू शकते. उत्पादक आणि फलदायीपणे कार्य करू शकते आणि तिचा समुदाय, तसेच व्यक्तिगत पातळीवर एखादी व्यक्ती तणाव, परस्पर संबंध आणि निर्णय घेण्याची क्षमता कशी हाताळते हे देखील ते ठरवते.

भारतामध्ये मानसिक आरोग्य धोरण आणि कायद्याचा प्रवास हा टप्प्याटप्प्याने प्रगती करत आलेला आहे. या प्रवासाची सुरुवात १९ व्या शतकात झाली, जेव्हा ब्रिटीश कालखंडात काही मानसिक आरोग्य संस्थांची स्थापना झाली. १८९७ साली लागू झालेला इंडियन लुनासी अॅक्ट हा कायदा मानसिक रुग्णांसाठी प्रथमच व्यवस्थात्मक दृष्टीकोन मांडणारा कायदा होता. मात्र, हा कायदा आजच्या दृष्टिकोनातून मागासलेला आणि अपुरा वाटतो. मात्र, त्या काळातील मानसिक आरोग्य व्यवस्थापन हे रुग्णांना वेगळे ठेवण्यावर अधिक लक्ष केंद्रित करत होते. हा कायदा रुग्णांना 'लूनाटिक' म्हणजेच वेडसर म्हणून वर्गीकृत करत असे. यामध्ये रुग्णांच्या कल्याणापेक्षा नियंत्रणाला प्राधान्य होते. या कायद्याचा उद्देश हा मानसिक आजाराने ग्रस्त व्यक्तींना ओळखणे आणि त्यांना वेगळे ठेवण्यासाठी नियामक व्यवस्था तयार करणे हा होता. तसेच मानसिक रुग्णांसाठी आश्रयगृहांची स्थापना करणे आणि त्यांचे प्रशासन ठरवणे आणि मानसिक आजारग्रस्त व्यक्तींवर नियंत्रण ठेवणे आणि त्यांना समाजापासून विलग करणे हा होता. या कायद्याचा परिणाम असा झाला की मानसिक आरोग्यासाठी मूलभूत वैधानिक चौकट उपलब्ध झाली, परंतु ती मुख्यतः संस्थात्मक नियंत्रणावर आधारित होती. मानसिक आरोग्यासंबंधी कलंक आणि नकारात्मकता वाढीस लागली. तसेच उपचारांची मर्यादा, पायाभूत सुविधा, आणि रुग्णांचे अधिकार याकडे दुर्लक्ष झाले. भारतातील मानसिक आरोग्य क्षेत्राच्या ऐतिहासिक प्रवासाचा हा कायदा एक महत्त्वाचा टप्पा मानला जाऊ शकतो, जो मानसिक आरोग्याच्या सध्याच्या प्रगत धोरणांसाठी शिकवण ठरला आहे. १८९७ चा इंडियन लुनासी अॅक्ट हा काळाच्या संदर्भात मानसिक आरोग्य व्यवस्थापनासाठी पहिला टप्पा ठरला असला, तरी तो उपचारांपेक्षा विलगीकरणावर आधारित होता. हा कायदा मानसिक आरोग्य व्यवस्थापनासाठी योग्य दिशादर्शक ठरला नाही. यावर आधारित अनुभव आणि चुका लक्षात घेऊन पुढे १९८७ आणि २०१७ चे कायदे अधिक सुस्पष्ट आणि मानवतावादी दृष्टिकोनात तयार करण्यात आले.

**१९८७ चा मानसिक आरोग्य कायदा :**

१९८७ चा मेंटल हेल्थ अॅक्ट हा भारतात मानसिक आरोग्यासाठी लागू केलेला पहिला व्यापक कायदा होता. या कायद्याचा उद्देश मानसिक आजाराने ग्रस्त व्यक्तींना त्यांच्या उपचारांसाठी योग्य सुविधा उपलब्ध करून देणे आणि त्यांच्या हक्कांचे संरक्षण करणे हा होता. याने १८९७ च्या इंडियन लुनासी अॅक्टची जागा घेतली, जो रुग्णांच्या हक्कांपेक्षा नियंत्रणावर अधिक भर देत असे. या कायद्यात मानसिक आजार असलेल्या व्यक्तींच्या उपचारांसाठी सुधारित आणि अधिक मानवीय दृष्टीकोन प्रदान करण्यात आला. तसेच मानसिक आरोग्य संस्थांमध्ये रुग्णांच्या प्रवेश, उपचार, आणि सुटकेसाठी निश्चित प्रक्रिया तयार करण्यात आली. य कायद्याद्वारे मानसिक रुग्णांचे हक्क संरक्षित करण्यात आले आणि त्यांचे व्यक्तीचे कुठलाही प्रकारे शोषण होणार नाही याची उपाययोजना करण्यात आली. मानसिक रुग्णांना मानवी हक्क मिळावेत, यावर भर देण्यात आला. मानसिक रुग्णांच्या हक्कांचे उल्लंघन होणार नाही यासाठी कायदेशीर नियंत्रणाचे प्रावधान करण्यात येऊन रुग्णांची गैरवर्तन किंवा अत्याचारापासून संरक्षण देण्यात आले.

## १९ डिसेंबर रोजी पन्नाशीतील ग्रंथालीया कार्यक्रमाचे आयोजन

**दि.१७, ठाणे :** मराठी साहित्य विश्वातील लोकप्रिय ग्रंथालीया संस्थेला दि.२५ डिसेंबर २०२४ रोजी पन्नास वर्षे पूर्ण होत आहे. त्यानिमित्ताने वैष्णो व्हिजन संस्थेच्या वतीने गुरुवार दि.१९ डिसेंबर २०२४ रोजी संध्याकाळी ५ वाजता मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे (प.) येथे पन्नाशीतील ग्रंथालीया विशेष गप्पा कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

या कार्यक्रमाचे अध्यक्ष पंचागकर्ते, खगोलशास्त्र अभ्यासक दा.कृ. सोमण हे आहेत. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे एस.एम.सी. इन्फ्रास्टक्चर संचालक सुहास मेहता हे असून विशेष निमंत्रित म्हणून मराठी भाषा विभाग संस्था, महाराष्ट्र राज्य आणि महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोष निर्मिती मंडळाचे संचालक डॉ.शामकांत देवरे व ठाणे जिल्हा माहिती अधिकारी मनोज शिवाजी सानप हे उपस्थित राहणार आहेत.

या गप्पा कार्यक्रमात माजी राज्यसभा सदस्य तथा ज्येष्ठ पत्रकार, संपादक कुमार केतकर, ज्येष्ठ पत्रकार, संपादक दिनकर गांगल, ग्रंथालीचे संपादक अरुण जोशी, ग्रंथाली संस्थेच्या विश्वस्त डॉ.लतिका भानुशाली व डॉ.मृण्मयी भजक यांचा यांचा सहभाग आहे. या कार्यक्रमात मुलाखतकार म्हणून जयु भाटकर हे असणार आहेत. तर संपूर्ण कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.अस्मिता पांडे करणार आहेत.

या कार्यक्रमाच्या निमित्ताने ठाण्यातील साहित्यिक अनंत देशमुख, अशोक बागवे, अनुपमा उजगरे, चांगदेव काळे आणि डॉ.निर्मोही फडके या साहित्यिकांचा सत्कारही करण्यात येणार आहे.

तरी, या कार्यक्रमासाठी रसिकांनी मराठी ग्रंथसंग्रहालय, पहिला मजला, वा.अ. रेगे सभागृह, स्टेशन रोड, ठाणे (प.) येथे दि.१९ डिसेंबर २०२४ रोजी सायंकाळी ५ वाजता उपस्थित राहावे, असे आवाहन वैष्णो व्हिजन संस्थेच्या संस्थापक व कार्यकारी निर्माती पद्मा भाटकर यांनी केले आहे.

### दंगा..

कुठे काही खुस्पट
लगेचं भडके दंगा
सु व्यवस्था फाटते
नाचे विक्षिप्त नंगा

राजकारण फोडणी
झण झणीत झिंगा
भडकावयास आगी
वारा घालतोय पिंगा

गुन्हेगारी आसुसली
दुषितकरायला गंगा
कशासाठी हा उद्रेक
कायझालयं ते सांगा

कायदा अन् नियमां
वेशीवर विवस्त्रटांगा
प्रतिपक्ष टपून बसले
करे कोलाहल कांगा

सुरेख सुंदर शहराला
कुरतडू लागला भुंगा
स्पोटक बनव स्थिती
ठिणगी लावा सुरुंगा

अफवावाटत फिरतो
समाजकंटक लफंगा
सहन करतो सामान्य
नको रे घ्यायला पंगा

प्रगतीपथावरती पहा
उलट्या चालती रांगा
करेतयारी मॅरेथॉनची
म्हणे सावकाश रांगा

स्पष्ट असून सगळे ते
का घेऊ बसले भिंगा
दोषी झाले भूमिगत
सरळ दाखवूनि ठेंगा

**- हेमंत मुसरीफ, पुणे.**
**९७३०३०६९९६**

# पत्नी पीडित पुरुषांना संरक्षण मिळावे!

**बंगळुरू मध्ये एका कंपनीत अभियंता असलेल्या ३४ वर्षीय अतुल सुभाष या तरुणाने पत्नीच्या जाचाला कंटाळून आत्महत्या केली. आत्महत्या करण्यापूर्वी या तरुणाने आपल्यावरील आपबिती ९० मिनिटांचा व्हिडिओ काढून तसेच ४० पाणी सुसाईड नोट लिहून सांगितली.**



या तरुणाला त्याच्या पत्नी आणि सासरच्यांनी हुंडाबळीच्या चुकीच्या आरोपाखाली तरुंगा मध्ये पाठवले होते. काहीही चूक नसताना या तरुणाला तुरुंगात जावे लागले. न्यायालयात तो स्वतःचं निर्दोषत्व सिद्ध करू शकला नाही. समाजात त्याची बदनामी झाली त्यामुळे आलेल्या नैराश्यातून त्याने आत्महत्या केली. अर्थात अशी आत्महत्या करणारा अतुल सुभाष हा पहिला तरुण नाही याआधीही अनेक तरुणांनी पत्नीच्या जाचाला कंटाळून आत्महत्या केल्या आहेत. ज्या तरुणांमध्ये आत्महत्या करण्याची हिंमत नसते ते तरुण पत्नीचा जाच मुकाटपणे सहन करतात किंवा घर सोडून आश्रमात जातात. औरंगाबादेतील वाळूंज भागात असाच पत्नी पिढीत पुरुषांचा आश्रम आहे. या आश्रमात काही पत्नी पिढीत पुरुष राहतात हे पत्नी पिढीत पुरुष वटपौर्णिमेच्या आदल्या दिवशी पिंपळ पूजन करून पिंपळ पौर्णिमा साजरी करतात. हे पुरुष दरवर्षी पिंपळ पौर्णिमा साजरी करतात. आमच्या बायकांनी आम्हाला इतका त्रास दिला आहे की आम्ही त्यांच्यासोबत सात जन्मच काय सात सेकंदही संसार करू शकत नाही म्हणूनच आम्हाला अशा प्रकारच्या बायका देण्यापेक्षा कायमस्वरूपी मुंजा ठेव अशी प्रार्थना ते यम आणि मुंजाला करतात. हा प्रकार काहीसा विचित्र वाटत असला तरी खरा आहे. कौटुंबिक हिंसाचारात महिलांवरच अन्याय अत्याचार होतो. महिलाच हिंसेचा बळी ठरतात हे आपल्याला माहीत आहे पण पुरुषही कौटुंबिक हिंसाचाराचे बळी ठरतात यावर अजूनही अनेकांचा विश्वास बसत नाही याला कारण आहे आपली पुरुष प्रधान संस्कृती. पुरुषच महिलांवर अत्याचार करतो, त्यांचा मानसिक छळ करतो हेच आजवर आपण पाहत आलो आहोत पण आता काळ बदलला आहे. पुरुषही महिलांच्या अत्याचाराला बळी पडत आहे. आज कितीतरी पुरुष महिलांचा मानसिक अत्याचार सहन करत आहेत. पत्नी आपल्यावर अत्याचार करते, आपला मानसिक छळ करते हे जर समाजात माहीत झाले तर आपलीच नाचक्की होईल या भीतीने अनेक पुरुष तो अत्याचार मुकाट्याने सहन करतात.

ज्यांना हा अत्याचार सहन होत नाही ते अतुल सुभाष सारखे तरुण आत्महत्येचा मार्ग स्वीकारतात. कायदाही महिलांच्याच बाजूने आहे. महिलेचा पती व त्याच्या कुटुंबियांकडून होणारा छळ रोखण्यासाठी ४९८ ( अ ) हा कायदा करण्यात आला. महिलांना संरक्षण देण्यासाठी तयार करण्यात आलेल्या या कायद्याच्या अलीकडे मोठ्या प्रमाणात दुरुपयोग होऊ लागला आहे. या माध्यमातून पती आणि सासरच्या लोकांविरुद्ध वैयक्तिक सुड उगवला जात आहे. महिलांनी त्यांच्या संरक्षणासाठी केलेल्या कायद्याच्या अशाप्रकारे दुरुपयोग करू नये अशी टिप्पणी माननीय सर्वोच्च न्यायालयाने देखील केली आहे. तरीही या कायद्याचा दुरुपयोग कमी होत नाही. पत्नीने पती विरुद्ध तक्रार दिली तर त्याची तातडीने दखल घेतली जाते. पत्नीवर अन्याय करणाऱ्या पतीला तात्काळ अटक केली जाते पण पतीला पत्नी विरुद्ध कारवाई करायची असेल, तर आपल्या देशात कौटुंबिक हिंसाचार अधिनियमना सारखा कायदा उपलब्ध नाही. सध्या असलेला कौटुंबिक अधिनियम संरक्षण कायदा पुरुषांना संरक्षण देत नाही. विकसित देशांमधील लिंग निरपेक्ष कायदे पुरुषांना महिलां प्रमाणे संरक्षण तर देतातच ; शिवाय पुरुष पीडित असू शकतात या वास्तवाचा स्वीकारही करतात. त्यामुळे तिथे या विषयावर संशोधनही होत असते आपल्या देशात पुरुषही महिला अत्याचाराने पीडित असतात हे वास्तव अजूनही स्वीकारले जात नाही. पुरुष कौटुंबिक हिंसाचाराचे बळी ठरुच शकत नाही अशी धारणा असणारे लोक सामान्यतः असा तर्क देतात की पुरुष हे महिलांपेक्षा बलवान असतात अशा स्थितीत महिला पुरुषांवर आघात कशा करू शकतात? पण एका संशोधनात असे सिद्ध झाले आहे की हिंसक संबंधांमध्ये महिलाही पुरूषां इतकीच आक्रमक होऊ शकते. शिवाय मानसिक छळ करण्यात महिलांचा हात कोणीही धरू शकणार नाही. विशेषतः जे संवेदनशील मनाचे पुरूष असतात ते अशा हिंसाचाराला बळी पडतात त्यामुळे महिलां प्रमाणेच पीडित पुरुषांनाही संरक्षणाचा अधिकार मिळावा यासाठी सरकारने कौटुंबिक हिंसाचार अधिनियम कायद्यात दुरुस्ती करून पत्नी पीडित पुरुषाना संरक्षण द्यावे.

**- श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**

## महाबळेश्वर नगरपरिषदेच्या वतीने माझी वसुंधरा क्रीडा मोहत्सव शुभारंभ

**अक्षराज : रियाज मुजावर**

**दि.१७, महाबळेश्वर :** महाबळेश्वर गिरिस्थान नगरपरिषद, मुख्याधिकारी योगेश पाटील यांच्या संकल्पनेतून पाच वर्षांच्या कालखंडानंतर क्रीडा महोत्सव २०२४ चे आयोजन करण्यात आले आहे. या महोत्सवात महाबळेश्वर शहरातील १३ शाळांमधील सुमारे १२०० विद्यार्थी-विद्यार्थिनींनी सहभाग नोंदविला आहे.

क्रिडा महोत्सवाचा सुंभारभ १७ डिसेंबर २०२४ रोजी सकाळी ९.०० वाजता छत्रपती शिवाजी महाराज चौक येथून मुख्याधिकारी, योगेश पाटील यांच्या हस्ते क्रिडा ज्योत प्रज्वलित करून करण्यात आला.

यावेळी नगरपरिषदेचे मुख्य लिपिक, आबाजी ढोबळे, वृक्ष अधिकारी, कल्याण हिवरे, तसेच अहमद नालबंद,बबन जाधव, सचिन दिक्षित उपस्थित होते. रॅली मुख्य बाजारपेठ मार्गे येथील प्रसिद्ध गोल्फ ग्राउंड येथे पोहचली. गोल्फ ग्राउंड येथे खेळाडूंचे संचलन व मान्यवरांना मानवंदना होऊन ट्रिपल महाराष्ट्र केसरी व सध्या अप्पर पोलीस अधीक्षक म्हणून कार्यरत असणारे




विजय चौधरी यांच्या हस्ते ध्वजारोहण होऊन स्पर्धेचे उदघाट्न करण्यात आले. यावेळी व्यासपीठावर प्रांताधिकारी राजेंद्र कचरे, तहसीलदार तेजस्वीनी पाटील, पो.नि.बापूसाहेब सांडभोर, उप पो नि रौफ इनामदार, उद्योगपती रमेश पलोड, माजी नगरसेवक, सुनिल शिंदे उपस्थित होते.

गेले ५ वर्षांपासून बंद पडलेला शालेय क्रिडा महोत्सव परत नव्या पर्वाने सुरु करण्यात आला असून सदर क्रिडा महोत्सवात एकूण ११ प्रकारचे खेळ समाविष्ट आहेत व ४ गटातील मुले व मुली यांच्या गटात या स्पर्धा पार पडणार आहेत.

विजेत्या खेळाडूंना सुवर्ण, रौप्य, कांस्य पदक व प्रशिस्तीपत्रक व सर्व सहभागी खेळाडूंना प्रशस्तीपत्रक देऊन गौरविण्यात येणार आहे. सदरच्या स्पर्धा यशस्वी पार पाडण्यासाठी मुख्याधिकारी योगेश पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली नगरपरिषद अधिकारी - कर्मचारी व विविध शाळांमधील शिक्षक असे सुमारे ४० जण मेहनत घेत आहेत.

या स्पर्धेचे विशेष आकर्षण म्हणजे जास्तीत जास्त पदके जिंकणाऱ्या प्राथमिक व माध्यमिक गटातील मुले व मुली असे एकूण चार जनरल चॅम्पियनशिप विजेते काढण्यात येणार असून त्यासाठी मोठे चषक शाळेस प्रदान केले जाणार असून हा गौरव विद्यार्थ्यांच्या खेळातील गुणवत्ता व शालेय संघाच्या एकत्रित मेहनतीचे प्रतीक ठरेल तसेच विद्यार्थ्यांना व संस्थेस प्रेरणादायी ठरेल , तरी महाबळेश्वर मधील नागरिक - पालक व क्रिडाप्रेमींनी या महोत्सवाला उपस्थित राहून विद्यार्थ्यांना प्रोत्साहन द्यावे

**- योगेश बाळकृष्ण पाटील,**
**प्रशासक तथा मुख्याधिकारी**

## पोलिस पाटील दिनानिमित्त पोलिस पाटलांचा सन्मान...

**अक्षराज : अशोक कुलकर्णी**

**दि.१७, कळंब :** महाराष्ट्र नाभिक महामंडळाच्या वतीने पोलिस पाटील दिन उत्साहात साजरा करण्यात आला. गावगाड्यामध्ये कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी जबाबदारी पोलिस पाटील यांच्यावर असते, पोलिस पाटील दिनाचे औचित्य साधून, महाराष्ट्र नाभिक महामंडळाच्या वतीने, पोलिस पाटील महासंघाचे जिल्हाध्यक्ष राजेभाऊ वाघमारे, पोलिस पाटील देवधानोरा, खामसवाडीचे



पोलिस पाटील विक्रम सुतार, आढाळ्याचे पोलिस पाटील प्रदीप वायसे, हळदगावचे पोलिस पाटील, महेश पांचाळ,यांचा माजी नगरसेवक सतिस टोणगे यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला.

यावेळी, अशोक कुलकर्णी, राजे सावंत, ग्रामसेवक बाळासाहेब हांगे, बालाजी खंडागळे, सागर कांबळे, गणेश काळे, आदी उपस्थित होते.

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायलयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# थोडक्यात

## बेकायदेशीरपणे वास्तव्य करणारे दांपत्यांना पोलिसांनी ठोकल्या बेड्या



**अक्षराज : विश्वनाथ शेनोय**

**दि.१७, कल्याण (ठाणे) :** कोळशेवाडीचे हद्दीत जुनी सोनिया कॉलनी विठ्ठलवाडी बेकायदेशीरपणे वास्तव्य करणारे बांगलादेशी दांपत्याचे नावे अंजुरा मो कमल हसन वय ३७ व्यवसाय महिला वेटर आणि मो कमल हसन मो हजरत अली वय ४४ असून व्यवसाय चालक असे भारतात बिना पासपोर्ट आणि विना विजाचे बेकायदेशीरपणे ८ वर्षापासून राहत असलेले गुन्हा पोलीस शिपाई रामदास ज्ञानेश्वर उगले वय ३२ गुन्हे घटक ०४ उल्हासनगर फिर्यादी म्हणून सरकार तर्फे नोंद करण्यात आले आहे. गुन्हे नोंद केल्यानंतर त्या दोन्ही दापत्यांना गुन्हे शाखा घटक ०४ आणि कोळसेवाडी पोलीस ठाणे संयुक्त कारवाई ने अटक केल्यानंतर सदर पुढील तपास वरिष्ठ पोलीस निरीक्षक अशोक कदम यांच्या मार्गदर्शनाखाली जी एम न्हायदे (गुन्हे प्रकटीकरण विभागाचे पोलीस निरीक्षक) करण्यात येणार असल्याचे माहिती दिली.

## आम्ही वारकरी परिवार सेवाभावी संस्थेचे स्वप्न झाले साकार



**अक्षराज : साहेबराव गागलवाड**

**दि.१७, नांदेड :** आम्ही वारकरी सेवाभावी संस्था नांदेड महाराष्ट्र राज्य या संस्थेच्या वतीने दिनांक १६ डिसेंबर २०२४ सोमवार रोजी पंढरपूर येथे सुभाष मोतीचंद शहा यांच्याकडील पंढरपूर नगरपालिका क्षेत्रातील एन.ए. झालेला २००० स्केवर फूटचा प्लॉट धर्मशाळा बांधण्यासाठी आज खरेदी करण्यात आला. या जागेची पाहणी व कागदपत्र तपासणीसाठी नारायण जोशी, भास्कर अण्णा रेडी, गंगाराम पांगरेकर, उत्तमराव बोपेवार, राहुल महाडिक, नितीन कौलवार यांचे मार्गदर्शन लाभले. आजच्या रजिस्ट्रीसाठी आम्ही वारकरी परिवार सेवाभावी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष राम महाराज पांगरेकर, संस्थापक सचिव व्यंकट महाराज जाधव माळकौठेकर, कोषाध्यक्ष शिवाजी मदमवाड व संस्थेचे सर्व संस्थापक सदस्य यांची उपस्थिती होती. त्याचबरोबर संस्थेला ज्यांचे नेहमी मार्गदर्शन लाभत असे आमचे रावसाहेब पा.शिराळे, रामजी पा.,दत्तराम गोरठेकर तसेच संस्थेचे सल्लागार गंगाधर पा. भरकडे, शिवाजी पांगरेकर महिला आघाडीच्या माता भगिनी, जिल्हा प्रसिद्धीप्रमुख चंपतराव डाकोरे तसेच नांदेड जिल्ह्यातील सर्व तालुक्यातील पदाधिकारी उपस्थित होते.

## टिएमटीच्या कंत्राटी कर्मचाऱ्यांचा संप मागे



**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.१७, ठाणे :** ठाणे महापालिका परिवहन उपक्रमातील टिएमटीच्या कंत्राटी कर्मचाऱ्यांनी मंगळवारी रात्री उशीरा संप मागे घेण्याचा निर्णय घेतला. कर्मचाऱ्यांच्या निव्वळ वेतनात साडे चार हजार रुपयांची वाढ करण्याचे आश्वासन प्रशासनाने दिल्यानंतर कर्मचाऱ्यांनी संप मागे घेतला. मंगळवारी दिवसभर सुरू असलेल्या या संपामुळे ठाणेकरांचे हाल झाले.

ठाणे महापालिका परिवहन उपक्रमाच्या ताफ्यात ४७४ बसगाड्या असून त्यापैकी ३९० बसगाड्या प्रत्यक्ष प्रवासी वाहतुकीसाठी उपलब्ध असतात. यातील २४० बसगाड्या कंत्राटी पद्धतीने चालविल्या जातात. मंगळवारी पहाटे या कंत्राटी पद्धतीने चालविल्या जाणाऱ्या बसगाड्यांवरील चालकांनी वेतनाच्या मुद्द्यावरून संप सुरू केला होता. त्याचा परिणाम ठाणेकरांना सहन करावा लागला. दिवसभर टिएमटीच्या थांबे, सॅटीस पुलावर प्रवाशांची गर्दी झाली होती.दरम्यान, संपाच्या कालावधीत केवळ १७० बसगाड्या उपलब्ध होत्या. टिएमटीच्या अधिकाऱ्यांनी संप मागे घेण्याची विनंती कर्मचाऱ्यांना केली. परंतु लिखीत स्वरूपात मागण्या मान्य केल्यास संप मागे घेण्याच्या निर्णयावर कर्मचारी ठाम होते. अखेर रात्री टिएमटीचे अधिकारी आणि कर्मचाऱ्यांच्या शिष्टमंडळाची चर्चा झाली. त्यानंतर रात्री ८.३० वाजताच्या सुमारास संप मागे घेण्याचा निर्णय कर्मचाऱ्यांनी घेतला. कामगारांच्या वेतनामध्ये साडे चार हजार रुपयांची वाढ करण्याचे आश्वासन देण्यात आल्याचे टिएमटीचे व्यवस्थापक भालचंद्र बेहरे यांनी सांगितले. प्रवाशांच्या गैरसोयीबद्दल दिलगीरी व्यक्त करत बुधवारी पहाटेपासून टिएमटी बसगाड्यांची वाहतुक सुरळीत होणार असल्याचेही ते म्हणाले.

## अल्पसंख्याक हक्क दिनाचे आयोजन




**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.१७, जालना :** अल्पसंख्याक हक्क दिवस म्हणून दिनांक १८ डिसेंबर २०२४ हा दिवस साजरा करण्यात येणार आहे. अल्पसंख्याक नागरिकांना त्यांच्या घटनात्मक आणि कायदेशिर हक्काची जाणीव, माहिती देण्यासाठी बुधवार, दि.१८ डिसेंबर २०२४ रोजी दुपारी १२ वाजता जिल्हाधिकारी कार्यालय, जालना येथे कार्यक्रम आयोजित करण्यात आला. तरी नागरिकांनी अल्पसंख्याक हक्क दिन कार्यक्रमास उपस्थित रहावे, असे आवाहन जिल्हा नियोजन अधिकारी तथा जिल्हा अल्पसंख्याक अधिकारी, जालना यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे केले आहे.

# वृद्ध महिलेला फसवून सोन्याचे दागिने केले लंपास

## २४ तासात टिळकनगर पोलिसांनी आरोपीला पकडून केली कारवाई



**अक्षराज : भानुदास गायकवाड**

**दि.१७, डोंबिवली (ठाणे) :** डोंबिवली पूर्वेच्या टिळकनगर भागात दिनांक १५ डिसेंबर २०२४ रोजी संध्याकाळी एका वृद्ध महिलेला फसवून तिच्या सोन्याच्या दागिन्यांची लूट केल्याचा प्रकार घडला. या प्रकरणी टिळकनगर पोलीस ठाण्यामध्ये गुन्हा दाखल करण्यात आला असून अवघ्या २४ तासांत पोलिसांनी आरोपी महिलेला पकडून लंपास केलेले सर्व दागिने हस्तगत केले आहेत.

फिर्यादी हंसा जयंतीलाल पांचाळ (६२), या गृहिणी, हिरण पार्क, डोंबिवली येथे राहतात. फिर्यादी गणपती मंदिर, हिरण पार्कजवळून जात असताना एका अज्ञात महिलेनं त्यांना वृद्ध महिलांना पैसे मिळत आहेत. पण त्यासाठी दागिने काढून ठेवावे लागतील असे सांगितले. आरोपीने हंसा पांचाळ यांच्याकडील १५ ग्रॅम वजनाची सोन्याची माळ, १० ग्रॅमची सोन्याची चेन, आणि ५ ग्रॅमच्या दोन कानातल्यांचा संच असा सुमारे २.१० लाख रुपये किमतीचा ऐवज लंपास केला. फिर्यादीने १६ डिसेंबर रोजी टिळकनगर पोलीस ठाणे गाठून तक्रार दाखल केली.

तात्काळ पोलिसांनी या प्रकरणी गुन्हा नोंदवून वरिष्ठ पोलीस निरीक्षक विजयकुमार कदम यांच्या नेतृत्वाखाली तपास सुरू केला. पोलीस उपनिरीक्षक तेजल पवार आणि त्यांच्या पथकाने परिसरातील सीसीटीव्ही फुटेजची चाचपणी केली. आरोपी महिलेला ओळखल्यानंतर पोलिसांनी तातडीने कारवाई करत तिला ताब्यात घेतले.

महिला पंचांच्या उपस्थितीत आरोपीची अंगझडती घेतल्यावर फिर्यादीचे सर्व दागिने हस्तगत करण्यात आले. या यशस्वी तपासासाठी अपर पोलीस आयुक्त संजय जाधव, पोलीस उपआयुक्त अतुल झेंडे आणि सहाय्यक पोलीस आयुक्त सुहास हेमाडे यांचे विशेष मार्गदर्शन लाभले. तपास पथकात श्रे.पो.उपनिरीक्षक चौगुले, पोहवा कांबळे, पगारे, राठोड, आणि मपोशि पोटघन यांचा समावेश होता. पोलिसांनी नागरिकांना आवाहन केले आहे की, अशा फसवणूक प्रकरणांपासून सतर्क राहावे व कोणतीही संशयास्पद घटना घडल्यास तात्काळ पोलिसांना कळवावे. टिळकनगर पोलिसांच्या या जलद आणि यशस्वी तपासामुळे एक मोठा गुन्हा उघडकीस आला असून, नागरिकांनी त्यांचे कौतुक केले आहे.

# मिंडा कंपनी ते बाबुर्डी रस्त्याचे डांबरीकरण वर्षाच्या आत उखडले

## निकृष्ट दर्जाचे काम झाल्याचा मनसे नेते रासकर यांचा आरोप



**मनसे नेते रासकर यांचा उपोषणाला बसण्याचा इशारा ठेकेदारावर योग्य ती कारवाई करून त्या ठेकेदाराचे लायसन्स कायमस्वरूपी रद्द करण्यात यावे. अद्याप अनेक ठिकाणी साइडपट्ट्या भरण्याचे काम बाकी आहे. रस्त्यावरील डांबर व खडी पूणपणे उखडून खड्डे पडले आहेत. त्यामुळे या रस्त्याची तातडीने पूर्ण न केल्यास १३ जानेवारी रोजी बाबुर्डी रोड म्हसने फाटा एमआयडीसी चौक येथे उपोषणाला बसणार असल्याचे मनसे नेते रविश रासकर यांनी सांगितले.**

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.१७, पारनेर (अहिल्यानगर) :** मिंडा कंपनी ते बाबुर्डी रस्त्याचे काम निकृष्ट दर्जाचे झाल्याने रस्ता ठिकठिकाणी उखडला आहे. त्यामुळे ठेकेदाराचा परवाना रद्द करून काम चांगल्या दर्जाचे करावे अन्यथा दिनांक १३ जानेवारी २०२५ ला उपोषण करण्याचा इशारा महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे पारनेर तालुका उपाध्यक्ष रविश रासकर यांनी निवेदनाद्वारे दिला आहे. निवेदनात म्हटले आहे की, या रस्त्याचे काम दिनांक ०५ जानेवारी २०२४ ला चालू झाले होते. या रस्त्याच्या कामाची मुदत १२ महिन्याची आहे.

ठेकेदाराने हे काम इस्टिमेटनुसार करणे अपेक्षित होते. परंतु ठेकेदार व सार्वजनिक बांधकाम विभागाच्या देखरेखीखाली होत असल्यामुळे त्यांनी कशाही पद्धतीने केलेल्या कामाकडे दुर्लक्ष करून ठेकेदाराला पाठीशी घालण्याचे काम अधिकाऱ्यांकडून होत आहे हे काम निकृष्ट दर्जाचे झाले असल्याचा आरोप मनसेचे नेते रविश रासकर यांनी केला आहे.

मिंडा कंपनी ते बाबुर्डी रस्त्याचे आत्ताचं डांबरीकरण होऊन काही दिवसांचा कालावधी गेला नाही तेच रस्त्यावर ठिकठिकाणी मोठमोठे खड्डे पडले आहेत. काही ठिकाणी रस्ता उखडल्याने खडी निघाली आहे. यामध्ये साईड पट्ट्या करण्यात आलेल्या नाहीत. मात्र हे काम कोणत्याही नियमाला धरून करण्यात आले नसून हा रस्ता उखडल्याने या कामावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. रस्ता बांधकामात वापरण्यात येणाऱ्या साहित्यावर सुद्धा प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. या रस्त्याच्या डांबरीकरणाची चौकशी करून ठेकेदारावर योग्य ती कारवाई करून ठेकेदाराचा परवाना रद्द करून हे काम चांगल्या दर्जाचे करण्यात यावे. असे रविश रासकर यांनी उप अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग पारनेर, कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग कार्यालय, अहमदनगर पोलिस अधीक्षक, जिल्हा चिकित्सा अधिकारी सिव्हिल हॉस्पिटल अहमदनगर यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे.

# जिल्ह्यात २ लाख ३५हजार शेतकर्यांनी उतरविला पीक विमा

## पारनेर, संगमनेर, नेवासा, राहुरी तालुक्यातील शेतकर्यांचा प्रतिसाद

**पीक विमा उतरविलेल्या शेतकर्यांची तालुकानिहाय संख्या व कंसात हेक्टरी क्षेत्र पुढील प्रमाणे अकोले ११,०३७ (१५,८७९) जामखेड १९,५४७ (२८,३१५) कर्जत १५,७६५ (२०,३६७) कोपरगाव १२,२८५ (१४,४४४) नगर १३,१३७ (१९,१७३) नेवासा २२,७२९ (२५,१८०) पारनेर २८,७६५ (३७,९००) पाथर्डी २१,८६३ (२५,६५६) राहाता १२,०२९(१४,३७१) संगमनेर २५,३११(२८०६७) शेवगाव ११,५३५(१२.२७१५) श्रीगोंदा ११,१३२(१२,२८६) श्रीरामपूर ९,९४२(११,४६७)**

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.१७, अहिल्यानगर :** चालू वर्षीच्या रब्बी हंगामातील प्रधानमंत्री पीक विमा योजनेत १५ डिसेंबर या शेवटच्या तारखेपर्यंत अहिल्यानगर जिल्ह्यातील २ लाख ३५ हजार ५५२ शेतकर्यांनी सहभाग नोंदवून आपल्या पिकांचा विमा उतरविला आहे. त्यांचे ५ लाख ३० हजार ४९० पीक विमा अर्ज प्राप्त झाले आहेत. यामुळे सरकारच्या विमा योजनेमध्ये जिल्ह्यातील रब्बी हंगामातील २ लाख ८७ हजार ७८५ हेक्टरवरील पीक क्षेत्र संरक्षीत झाले आहे. जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी सुधाकर बोराळे यांनी ही माहिती दिली.

राज्य सरकारच्यावतीने शेतकर्यांना १ रूपयात पीक विमा योजना सुरू करण्यात आली असून त्यात मोठ्या संख्येने शेतकरी सहभागी होताना दिसत आहेत. अहिल्यानगर जिल्ह्यात रब्बी हंगामात गहू, ज्वारी, हरभरा, कांदा या प्रमुख पिकांचा विमा शेतकर्यांकडून उतरविण्यात आला आहे. चालू हंगामात २ लाख ३५ हजार ५५२ शेतकर्यांनी विमा उतरविण्यासाठी ५ लाख ३० हजार ४९० अर्ज दाखल केले आहेत.

यामध्ये ७ हजार ९३८ कर्जदार तर ५ लाख २२ हजार ५५२ बिगरकर्जदार अर्जाचा समावेश आहे. सर्वाधिक पारनेर तालुक्यातील २८ हजार ७५६ शेतकर्यांनी विमा उतरवितला आहे. त्याखालोखाल संगमनेर तालुक्यातील २५ हजार ३११, नेवासा २२ हजार ७२९, राहुरी २१ हजार ४७७ शेतकर्यांनी या योजनेत सहभागी होत पीक विमा उतरविला आहे. श्रीरामपूर, शेवगाव, श्रीगोंदा, अकोले, कोपरगाव तालुक्यातील शेतकर्यांचा या योजनेत सहभाग कमी असल्याचे दिसून आले आहे.

# महाराष्ट्र गोसेवा आयोगाच्या नवीन संकेतस्थळाचे मुख्यमंत्री यांच्या हस्ते अनावरण

**अक्षराज : धर्मेंद्र वर्पे**

**दि.१७, सातारा :** राज्यातील गोवंशाचे संवर्धन करण्यासाठी स्थापन करण्यात आलेल्या महाराष्ट्र गोसेवा आयोगाच्या www.mahagosevaayog.org या नवीन संकेतस्थळाचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते मंगळवार, दिनांक १७ डिसेंबर २०२४ रोजी येथे अनावरण करण्यात आले. विधानभवनातील समिती सभागृहात या संकेतस्थळाचे अनावरण करण्यात आले. राज्यामध्ये देशी गोवंशाचे संवर्धन, संरक्षण व कल्याण करण्यासाठी आणि त्यासाठी कार्यरत असणाऱ्या संस्थांचे पर्यवेक्षण करण्यासाठी, गोसेवा आयोगाची स्थापना करण्यात आली आहे.

राज्यात १ कोटी ३९ लाख गोवंश असून त्यामध्ये १३ लाख देशी गायी असल्याची माहिती अध्यक्ष शेखर मुंदडा यांनी दिली. 'गो टेन' अंतर्गत गो संगोपन, गो संवर्धन, गो संरक्षण, गोमय मुल्यवर्धन, गोशाळा, गोरक्षक, गोपालक, गो आधारीत शेती, गो साक्षरता आणि गो पर्यटन या माध्यमातून गायींच्या संवर्धनाचे काम करण्यात येत आहे. राज्यात देशी गायींसाठी विशेष दुग्धशाळा (डेअरी) निर्माण करण्यात येतील,असेही श्री. मुंदडा यांनी सांगितले.

आयोगामार्फत देशी गोवंशाचे संवर्धन, संरक्षण व कल्याण करणे व त्यासाठी कार्यरत असणाऱ्या संस्थांचे पर्यवेक्षण केले जात आहे. गोशाळा, गोसदन, पांजरपोळ व गोवंश संस्थांची नोंदणी, गोवर्धन गोवंश सेवा केन्द्र योजना व इतर योजना अंतर्भूत करणे व त्याची अंमलबजावणी करणे, पशुआरोग्य सेवांचे प्रचालन करणे, दुर्बल, वयस्क व रोगग्रस्त पशुंचे व्यवस्थापन, काळजी व उपचार यांची सुनिश्चिती, पशुंची काळजी घेणाऱ्या व्यक्तींचे प्रशिक्षण आणि जनजागृती केली जात असून त्याबाबतची माहिती संकेतस्थळाच्या माध्यमातून सार्वजनिक करण्यात आली आहे. सर्वसामान्य जनता आणि गोवंश संवर्धन करणाऱ्या संस्थांसाठी या संकेतस्थळाच्या माध्यमातून एका क्लिकवर माहिती उपलब्ध करून दिली आहे. संकेतस्थळाच्या अनावरण प्रसंगी राज्याच्या मुख्य सचिव सुजाता सौनिक, गोसेवा आयोगाचे सदस्य सर्वश्री संजय भोसले, डॉ. नितीन मार्कंडेय, उद्धव नेरकर, सुनील सूर्यवंशी, सनत कुमार गुप्ता, दीपक भगत आदी उपस्थित होते.


# पनवेल मनपा तर्फे अतिक्रमण विरोधात तोडक कारवाई

**अक्षराज : जे.के.पोळ**

**दि.१७, पनवेल :** महानगरपालिका कार्यक्षेत्रात अनधिकृतपणे रस्त्यांवर, फूटपाथवर अतिक्रमण करणाऱ्या फेरीवाल्यांवर, व्यावसायिकांवर, खाद्य व्यवसायिकांवर आज घेतलेल्या बैठकीमध्ये आयुक्त मंगेश चितळे यांनी तोडक कारवाई करण्याबाबत कठोर सूचना दिल्या आहेत.

फूटपाथवर तसेच रस्त्यांवरील वाढत्या अतिक्रमणामुळे वाहतूकीला व पादचाऱ्यांना चालण्यास अडथळा निर्माण होत असल्याने महापालिकेच्या वतीने ही तोडक कारवाईची मोहीम हाती घेतली आहे. यावेळी उपायुक्त कैलास गावडे व रविकिरण घोडके, सहाय्यक आयुक्त डॉ. रूपाली माने, श्रीराम पवार, सुबोध ठाणेकर, अतिक्रमण विभाग प्रमुख व अधिक्षक सदाशिव कवठे, प्रभारी अधिक्षक रोशन माळी, जितेंद्र मढवी, अरविंद पाटील, अमर पाटील उपस्थित होते.

या बैठकीत महापालिका कार्यक्षेत्रात भरत असलेल्या अधिकृत बाजाराव्यतिरीक्त अनधिकृत आठवडी बाजारांवर देखील महापालिकेच्या वतीने कठोर कारवाई करण्याबाबत आयुक्तांनी



सूचना दिल्या. तसेच रस्त्यांवरती वाहतुकीस अडथळा आणून सुरू असलेल्या अनधिकृत खाद्यपदार्थांच्या गाड्या अगर स्टॉलवर तोडक कारवाई करून सिलेंडर जप्त करण्याबाबत आयुक्तांनी उपस्थितांना सूचना दिल्या.

गेल्या आठवड्यापासून महापालिका कार्यक्षेत्रात अनधिकृत व्यवसायिकांविरोधात मोठी तोडक कारवाई करण्यात येत असून खारघरमध्ये जलवायू रोडवरती अनधिकृतरित्या व्यवसाय करणाऱ्या फेरीवाल्यांमुळे वाहतुक कोंडी होत असल्याने याठिकाणी तोडक कारवाई केली. खारघर मधील सेक्टर १९ मध्ये मार्केट मध्ये रस्त्यावर अनधिकृतपणे व्यवसाय करणाऱ्यांवर तसेच अनधिकृत हातगाड्यांवर जेसीबीच्या मदतीने तोडक कारवाई करण्यात आली.

टोल नाका हायवेवर अनधिकृत व्यवसायिकांवर कारवाई करून फुटपाथ व रस्ता मोकळा केला. कळंबोलीमध्ये रस्त्यावर अनधिकृत भाजीचा, आईस्क्रीमचा, फूलविक्रीचा, खाद्यपदार्थ विक्रीचा व्यवसाय करणाऱ्या व्यवसायिकांवर अतिक्रमण विभागाने तोडक कारवाई करून सर्व सामान जप्त केले. रोडपाली कमानीजवळ अनधिकृत व्यवसाय करणाऱ्यांवर तोडक कारवाई करण्यात आली. प्रभाग समिती ब अंतर्गत खांदा कॉलनी, न्यू पनवेल फुटपाथ वरील अनधिकृत स्टॅन्ड व बॅनर काढण्यात आले.

हायवेवरील सर्व हेल्मेट विक्रेत्यांवर कारवाई करण्यात आली. तसेच भीमा कॉम्प्लेक्स येथील अनधिकृत टपरींवर कारवाई करण्यात आली. याबरोबर तळोजा फेज १ व नावडे फेज २ मध्ये यांनी फूटपाथवरती खाद्यपदार्थांच्या दुकानाबाहेर अतिक्रमण करून विकल्या जाणाऱ्या अनधिकृत खाद्यपदार्थांच्या स्टॉल्सवरती अतिक्रमण विभागाच्या सहाय्याने कारवाई केली. शनिवारी मार्केट रोड वरती अनधिकृत व्यवसायिकांना बसण्यास मनाई करून रस्ता वाहतूकीसाठी मोकळा ठेवण्यात आला. रविवार मार्केट बंद ठेवण्यात आले व मार्केटमध्ये अनधिकृतपणे व्यवसाय करु दिला नाही.

खांदेश्वर येथील फुटपाथवर अनधिकृतपणे व्यवसाय करणाऱ्या व्यवसायिकांवर अतिक्रमण विभागाच्यावतीने कारवाई करून सर्व सामान जप्त करण्यात आले. तसेच कामोठेमध्ये सेक्टर ७ व ८ येथील विजय मेडिकलच्या बाजूस व स्वस्तिक हॉटेल च्या लगत असलेल्या अनधिकृत हातगाडींवर कारवाई करून ऍक्सिस बँक समोरील चौकात त्या तोडण्यात आल्या.

याबरोबरच कामोठ्यातील संत तुकाराम महाराज मार्गावरील फूटपाथवर तसेच मेन रोडवर अनधिकृत फळविक्रत्यांवर तोडक कारवाई करण्यात आली. मेन रोडवरील दुकानदारांनी दुकानाबाहेर ठेवलेले सामान जप्त करण्यात आले. पनवेलमधील उरण नाका व लाईन आळी येथे रस्त्यावर व फूटपाथ वर विक्री करणाऱ्यांवर कारवाई करून माल जप्त करण्यात आला. तसेच टपाल नाका, बालाजी मंदिर रोड, नवीन पनवेल स्टेशन परिसरात कारवाई करून सामान जप्त करण्यात आले आहे.

# सातारा येथे महाराष्ट्र कुस्ती संमेलन २०२४ संपन्न

**अक्षराज : धर्मेंद्र वर्पे**

**दि.१७, सातारा :** सातारा येथील जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय योगा हॉल येथे सुजन फौंडेशन या संस्थेच्या वतीने दूसरे महाराष्ट्र कुस्ती संमेलन संपन्न झाले. समारंभाचे अध्यक्षस्थानी वस्ताद सोपानराव गोडसे होते. प्रमुख उपस्थिती म्हूणन उपमहाराष्ट्र केसरी साहेबराव जाधव, हिंद केसरी गणपतराव आंधळकर यांचे पुतणे दत्ताजीराव आंधळकर उपस्थित होते.

महिलांच्या हस्ते फीत कापून आणि जागतिक कीर्तीचे मल्ल ऑलम्पिक वीर श्रीरंग जाधव यांच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमांस शुभारंभ झाला. समारंभाचे स्वागताध्यक्ष पैलवान रवींद्र काकडे यांनी उपस्थित पैलवान, कुस्तीगीर, कुस्ती आखाडा प्रमुख व कुस्तीप्रेमीचे स्वागत केले. याप्रसंगी कुस्ती खेळाकरिता



आपले आयुष्य समर्पित केले. कुस्ती जगले कुस्तीच्या निकोप वाढीकरिता योगदान दिले. खेळाडू व कुस्तीगीर घडवले आशा व्यक्तींना राष्ट्रीय खलिफा पुरस्कार प्रदान करण्यात आले.

यामध्ये पै.कुमारी प्रतीक्षा दशरथ सुतार मुळशी जिल्हा पुणे, क्रीडा शिक्षक पूजा संजय पाटील मिरज, वस्ताद आयुब शेख आरण्यश्वर लाल माती कुस्ती आखाडा जामखेड, वस्ताद-सचिन बनकर, जय हनुमान कुस्ती केंद्र, निमगाव केतकी इंदापूर वास्ताद - मारुती माळी, रेंदाळ तालीम जिल्हा कोल्हापूर वस्ताद नजरुद्दीन नायकवडी, शिवछत्रपती पुरस्कार पहिले मानकरी, क्रीडाशिक्षकः विष्णु आदनाक जाम गाव ता.आष्टी जिल्हा बीड. यांना प्रदान करण्यात आले. स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्योत्तर कालावधीमध्ये कुस्ती या खेळाकरिता आपले आयुष्य वेचले असे जागतिक कीर्तीचे मल्ल ऑलम्पिक वीर श्रीरंग जाधव आप्पा क्षेत्र माहुली सातारा, यांचा सन्मान सुभद्रा जाधव व जाधव परिवार यांनी स्वीकारला. वस्ताद शंकरराव भाऊराव मदने, डिस्कळ यांना मरणोत्तर राष्ट्रीय खलिफा पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.याप्रसंगी वीरेंद्र जाधव, अमर जाधव, प्रताप साळुंखे, पैलवान शंकरराव गमरे, रघुनाथ उगले, उद्धव साळुंखे, मल्हारी मदने, सलीम पठाण, पैलवान जस्मिन शेख नलवडेवाडी, सरपंच सुनंदा माळी पुसेसावळी, शिवानी सोनवणे नाशिक, रुपाली निगुडे, अरुणा जाधव, शिवांगी शिंदे, गोविंद पोळ तसेच सातारा,सांगली, पुणे,नाशिक, अहिल्यानगर, सोलापूर, बीड,सांगली व कोल्हापूर परिसरातील पैलवान बहुसंख्येने उपस्थित होते. जिल्हा क्रीडा कार्यालय यांचे सहकार्य लाभले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक अजित जाधव यांनी केले. सूत्रसंचालन संपतराव जाधव यांनी केले.आभार सौ सुरय्या नायकवडी यांनी मानले.

# खापरखेडा वीज केंद्राला आमदार डॉ.आशिष देशमुखांची सदिच्छा भेट

## स्थानिकांचे प्रश्न हाताळा, महानिर्मिती कंपनीच्या अधिकाऱ्यांना निर्देश

**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.१७, नागपूर :** सावनेर-कळमेश्वर विधानसभा मतदार संघाचे नवनिर्वाचित आमदार डॉ. आशिष देशमुख यांनी नियोजित दौऱ्यानुसार मंगळवार, दिनांक १७ डिसेंबर मंगळवारला खापरखेडा औष्णिक वीज केंद्राला सदिच्छा भेट देऊन ५०० मेगावॅट खापरखेडा औष्णिक वीज केंद्राची पाहणी केली.

यावेळी डॉ.आशिष देशमुख यांच्यासह महाराष्ट्र राज्य वीज सूत्रधार कंपनीचे (स्वतंत्र) संचालक विश्वास पाठक पाठक, भाजपा प्रदेश कार्यकारणी सदस्य डॉ. राजीव पोतदार, महानिर्मितीचे संचालक (संचलन) संजय मारुडकर, संचालक (प्रकल्प) अभय हरणे, कार्यकारी संचालक (संचलन-२) पंकज सपाटे, कार्यकारी संचालक (संचलन -१) राजेश पाटील, कार्यकारी संचालक (स व सु -१) विवेक रोकडे, प्रभारी कार्यकारी संचालक पंकज नागदेवते, मुख्य अभियंता विजय राठोड, विवेक रोकडे, उपमुख्य अभियंता विराज चौधरी, सुदीप राणे, नारायण राठोड यांच्यासह खापरखेडा औष्णिक वीज केंद्राचे अधिकारी प्रामुख्याने उपस्थित होते.स्थानिकांचे प्रश्न सोडण्याविण्याच्या दृष्टीकोनातून आमदार डॉ.आशिष देशमुख यांनी स्थानिक व्यवस्थापन व महानिर्मिती कंपनीच्या अधिकाऱ्यांच्या बैठकीचे आदेश दिले होते. यासंदर्भात खापरखेडा औष्णिक वीज केंद्राच्या सर्व्हिस बिल्डींग येथे बैठक आयोजित करण्यात आली. यावेळी खापरखेडा रेल्वे क्रॉसिंग उड्डाणपूलाचा मुद्दासह भानेगाव उड्डाणपूल सर्व्हिस रोड व इतर मागण्या उपस्थित करण्यात आल्या.

यावेळी झालेल्या चर्चेदरम्यान राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण नागपूरच्या अधिकाऱ्यांना खापरखेडा रेल्वे क्रॉसिंग उड्डाणपूल, भानेगाव उड्डाणपूल सर्व्हिस रोड व इतर मागण्या संदर्भात आवश्यक सूचना दिल्या, शिवाय मुख्य बाजारपेठेतील दुकानदार बाधित होणार नाहीत त्यांना त्यांच्या हक्काची जागा कशी उपलब्ध करून देता



येईल. यावर सखोल चर्चा करण्यात आली. यावेळी जॉर्ज कॉलनी परिसरात असलेली जागा खेळाच्या मैदानासाठी उपलब्ध करून देण्याची मागणी स्थानिकांनी केली. खापरखेडा परिसरात खेळाचे मैदान नाही.

त्यामुळे खापरखेडा वासियांना त्यांच्या हक्काचे खेळाचे मैदान मिळावे. या दृष्टीकोनातून आवश्यक कार्यवाही करण्याचे आदेश महानिर्मिती कंपनीच्या अधिकाऱ्यांना आमदार डॉ.आशिष देशमुख यांनी दिले. यावेळी महानिर्मिती कडून आश्वासन देण्यात आले.

याप्रसंगी खापरखेडा, भानेगाव सिल्लेवाडा, पोटा, चनकापूर, रोहना, वलनी, दहेगाव (रंगारी) आदि प्रकल्पग्रस्त गावात महानिर्मिती कंपनीच्या सीएसआर फंडातून स्थानिकांच्या मागणीनुसार कल्याणकारी योजना राबविण्याच्या दृष्टीकोनातून सखोल चर्चा करण्यात आली. यावेळी सुशिक्षित बेरोजगार व मय्यत कामगार यांच्या वारसांना त्वरित रोजगार उपलब्ध करून देण्याच्या सूचना डॉ.आशिष देशमुख यांनी दिल्या. शिवाय कन्व्हेअर कोल-वे पाईप प्रकल्पात बाधित झालेल्या भानेगावातील तरुणांना त्वरित कामावर घेण्याच्या सूचना देण्यात आल्या.

याप्रसंगी स्थानिकांचे प्रश्न हाताळण्यासाठी कृती समिती तयार करण्याचे आदेश महाराष्ट्र राज्य वीज सूत्रधार कंपनीचे (स्वतंत्र) संचालक विश्वास पाठक यांनी महानिर्मिती कंपनीच्या अधिकाऱ्यांना दिले. यावेळी डॉ. आशिष देशमुख यांच्या समोर वीज निर्मितीचा आलेख सादर करण्यात आला. कमी पैशात वीज निर्मिती करून राज्यातील जनतेला उपलब्ध करून द्यावी, असे आवाहन डॉ.आशिष देशमुख यांनी महानिर्मिती कंपनीच्या अधिकाऱ्याना केले. यावेळी भाजपा पदाधिकारी, कार्यकर्ते, सरपंच, उपसरपंच, ग्रा.सदस्य, कंत्राटदार, कंत्राटी कामगार व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# थोडक्यात

## ग्रामपंचायत कर्मचारी यांचे धरणे आंदोलन मागे



**अक्षराज : साहेबराव गागलवाड**

**दि.१७, मुदखेड (नांदेड) :** मुदखेड तालुक्यातील सर्व ग्रामपंचायत कर्मचारी यांना थकित एरिएस रक्कम राहणीमान भत्ता व विशेष भत्ता न मिळाल्यामुळे तालुक्यातील ग्रामपंचायत कर्मचारी दि.१६ डिसेंबर २०२४ पासून पंचायत समिती समोर बेमुदत धरणे आंदोलनास बसले आहेत.

ग्रामपंचायत कर्मचारी यांचे थकीत एरीएस (फरकाची रक्कम) ९ महिण्याचे मुदखेड पंचायत समितीला ४० लाख ६५ हजार रुपये एवढी रक्कम ८३ कर्मचाऱ्यांसाठी आलेली होती. तालुक्यातील ग्रामपंचायत कर्मचारी ८१ ते ८३ एवढे असुन त्याचे ९ महिण्याचे एरीएस. ५३ हजार ते ५४ हजार. त्यांच्या खात्यात पंचायत समितीने भेदभाव करून कर्मचाऱ्यांना नियमाप्रमाणे रक्कम अदा न करता पंचायत समितीच्या अधिकाऱ्यांनी मनमानी रक्कम अदा केली .

तरी पण ग्रामपंचायत कर्मचारी यांच्या खात्यात १७ हजार, २२ हजार, २५ हजार, २८ हजार ८५२.

अशा पध्दतीत वर्ग करण्यात आले आहेत काही कर्मचाऱ्यांचे अनुपस्थिती दाखवली तरी पण शासन निर्णया प्रमाणे त्या काळामध्ये वसुलीची अट रद्द करण्यात आली होती. तरी पण त्यांचा शासन निर्णय आहे. काही ग्रामपंचायत कर्मचारी यांना एरिएस ची रक्कम ५३०००, ५१०००, ४८००० असे जमा करण्यात आली शासन निर्णयानुसार ग्रामपंचायत कर्मचारी यांना समान एरिएस रक्कम अदा करण्यात यावी. जोपर्यंत मुदखेड तालुक्यातील राहिलेल्या कर्मचाऱ्यांच्या एरिएसची रक्कम त्यांच्या खात्यात तात्काळ अदा करण्यात येणार नाही तोपर्यंत धरणे आंदोलन करणार असल्याचे सांगितले होते. परंतु दिनांक १७ डिसेंबर रोजी गटविकास अधिकारी यांच्या मध्यस्थीने धरणे आंदोलन मागे घेण्यात आले.

## जिल्ह्यात वंधत्व व उशिरा गर्भधारणा समस्येवर 'फर्टिलिटी ओपीडी' सुरू

### नागरिकांनी आरोग्य यंत्रणेच्या सुविधेचा लाभ घ्यावा

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.१७, नांदेड :** बदललेली जीवनशैली व ताण तणावाचे वातावरण यामुळे अनेक ठिकाणी योग्य उपचार व नेमक्या वैद्यकीय विश्लेषण व सल्लया अभावी वंध्यत्व व उशिरा गर्भधारणेची समस्या समाजामध्ये जाणवते. नांदेड जिल्हा प्रशासनाने यासाठी पुढाकार घेतला असून नागरिकांनी शासकीय आरोग्य संस्थामध्ये या संदर्भातील मार्गदर्शन घेण्याचे आवाहन प्रशासनाने केले आहे. सध्या समाजामध्ये वंध्यत्वाचे व उशिराने गर्भधारणा होण्याचे प्रमाण वाढत आहे. ही समस्या लक्षात घेऊन नांदेड जिल्ह्यामध्ये मार्च २०२४ पासून जिल्हा प्रशासन व श्री गुरूगोविंदसिंघजी स्मारक जिल्हा रुग्णालय नांदेड यांच्यातर्फे वंधत्व निवारण कार्यक्रम सुरू करण्यात आला. या अनुषंगाने जिल्हा रुग्णालय त्याचप्रमाणे जिल्ह्यातील ६ उपजिल्हा रुग्णालय व १२ ग्रामीण रुग्णालय याठिकाणी फर्टिलिटी ओपीडी अर्थात वंध्यत्व निवारणासाठी विशेष ओपीडी आठवड्यातून एक दिवस चालवली जाते. आतापर्यंत सरासरी प्रत्येक महिन्यात ५०० पेक्षा जास्त ' नागरिकांनी या ओपीडीला भेट देऊन आपल्या समस्यावर मार्ग काढण्याचा प्रयत्न केला आहे.अनेक दाम्पत्याच्या आयुष्यात नवे अंकुर फुटण्यास यामुळे मदत झाली आहे.

या ओपीडीमध्ये आलेल्या नागरिकांच्या अनुभवावरून हे लक्षात येते की, बहुतांश जीवनशैली व ताणतणावामुळे उशिराने गर्भधारणा होणे किंवा न होणे अशा प्रकारे त्याचे परिणाम होतात. तसेच मुलभूत स्वरुपाच्या तपासण्या करून उदाहरणार्थ सिमेन ॲनालिसिस,फॉलिक्युलर स्टडी तसेच हॉर्मोन्स तपासणी हे करून वंध्यत्वाचे किंवा उशिरा गर्भधारण होण्याचे मूळ कारण शोधण्याचा प्रयत्न केला जातो. या उपक्रमामुळे अनेक जोडप्यांच्या जीवनात नवीन अंकुर फुलण्यास मदत होत आहे. आगामी काळात हा उपक्रम मोठ्याप्रमाणत नांदेड जिल्ह्यातील नागरिकांसाठी फलदायी अशाप्रकारचा राहणार आहे. तसेच या सुविधा प्राथमिक आरोग्य केंद्रावर देखील उपलब्ध करून देण्याकडे प्रशासनाचा कल असून नागरिकांनी अत्यंत नैसर्गिक असणाऱ्या या समस्येसाठी योग्य सल्ला घेण्याच्या आवाहनही जिल्हा प्रशासनाने व आरोग्य विभागाने केले आहे.

## मुख्यमंत्री वयोश्री योजनेच्या लाभार्थ्यांना आवाहन




**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.१७, जालना :** राज्यातील ६५ वर्षे व त्यावरील ज्येष्ठ नागरिकांना त्यांच्या दैनंदिन जीवनात सामान्य स्थितीत जगण्यासाठी व वयोमानापरत्वे येणाऱ्या अपंगत्व, अशक्तपणावर उपाययोजना करण्यासाठी आवश्यक सहाय्य साधने, उपकरणे खरेदीसाठी मुख्यमंत्री वयोश्री योजना सुरु करण्यात आली आहे. जालना जिल्ह्यात मुख्यमंत्री वयोश्री योजनेअंतर्गत ५ हजार ११३ पात्र लाभार्थींना शासनाकडून प्रत्येकी ३ हजार रुपये आधार संलग्न बँक खात्यात रक्कम जमा केली आहे. तरी अशा लाभार्थ्यांनी शासन निर्णयातील नियमानुसार साहित्य, उपकरणे खरेदी करुन त्याचे देयक (पावती) सहायक आयुक्त समाजकल्याण जालना यांच्या कार्यालयात जमा करावेत, असे आवाहन सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण, जालना यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे कळविले आहे.